# सेवक वार्ता

जून-२०२३

वर्ष -४, अंक-८

कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, भांबुर्डा वन विहार, गोखले नगर, पुणे - १६

### सामाजिक वनीकरण विभागातील रोपवाटिकांचे सेवक संघामार्फत मूल्यांकन

सामाजिक वनीकरण विभागातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोपवाटिकांचे बळकटीकरण या योजनेअंतर्गत रोपवाटिकांचे सेवक संघामार्फत मुल्यांकन करण्याचे क्षेत्रीय काम ३१ मे २३ रोजी पूर्ण करण्यात आले.

### *नवी आव्हाने*

नाशिक जिल्ह्यातील नार-पार गिरणा पाटबंधारे प्रकल्पासाठी वन संवर्धन कायद्यांतर्गत मंजुरीसाठी प्रस्ताव तयार करण्याच्या कामाविषयी दुसरी Google मीट २५ मे २३ रोजी सकाळी 11.00 वाजता रोजी बैठक घेण्यात आली.



श्री. अनारसे मु.व.स. निवृत्त झाले. त्यांना सेवक सदस्य अमरावती यांनी निरोप दिला.







### सेवक सदस्य रमेश सोनटक्के यांचेकडून जागतिक पर्यावरण दिन काव्य भेट

•|| निसर्गायन ||•

आज (जा.प.दि) ५जून
करु पर्यावरण सक्षम .. धृ..
होऊ अंतर्मुख
घेऊन शाकाहार सात्विक
थांबवू पशुबळी वृद्धीपशुधन .. १..
लावू वेलि,वृक्ष,वल्ली
समृद्ध करु माय पृथ्वी
जगन्माता तु वसुंधरा .. २..
आम्ही भारतीय जनता
ऋषी-कृषि परंपराच आमुची
त्याग, सेवा तपस-भाषा.. ३..
अंगीकृत करु सर्व काही
शांत समृद्धकरण्या जगन्माता
अवलंबू आधुनिक तंत्र .. ४..
स्वबदलाची ग्वाही शपथ
करेल सर्व व्यवस्थित.. ५..
आत्मावलोकन आत्मपरीक्षण
प्रसिद्धी योग्य कर्तव्य कर्म ..६.
निसर्ग शपथ संवर्धन
५ जून महिना : वर्ष संपूर्ण.. ७..

**************************

### *जागतिक पर्यावरण दिवस खास.*

श्री समर्थ रामदास स्वामी लिखित 'बाग' प्रकरण अवश्य वाचावे. या प्रकरणात समर्थांनी तब्बल २९५ झाडांची नावे सांगितली आहेत. एका संताचा वनस्पती शास्त्राचा अभ्यास आज आपल्याला थक्क करून सोडणारा आहे.

प्रसंग निघाला स्वभावें ।
बागेमध्ये काय लावावे ।
म्हणूनि घेतली नावे ।
काही एक ॥
कांटी रामकांटी फुलेकांटी ।
नेपती सहमुळी कारमाटी ।
सावी चीलारी सागरगोटी ।
हिंवर खैर खरमाटी ॥
पांढरफळी करवंदी तरटी ।
आळवी तोरणी चिंचोरटी ।
सिकेकाई वाकेरी घोंटी ।
करंज विळस समुद्रशोक ॥
अव्हाटी बोराटी हिंगणबेटी ।
विकळी टांकळी वाघांटी ।
शेर निवडुंग कारवेटी ।
कांटेशेवरी पांगेरे ॥
निरगुडी येरंड शेवरी ।
कासवेद कासळी पेरारी ।
तरवड उन्हाळ्या कुसरी ।
शिबी तिव्हा अंबोटी ॥
कांतुती काचकुहिरी सराटी ।
उतरणी गुळवेल चित्रकुटी ।
कडोची काटली गोमाटी ।
घोळ घुगरी विरभोटी ॥
भोंस बरु वाळा मोळा ।
ऊंस कास देवनळा ।
लव्हे पानि पारोस पिंपळा ।
गुंज कोळसरे देवपाळा ॥
वेत कळकी चिवारी ।
ताड माड पायरी पिंपरी ।
उंबरी अंबरी गंभिरी ।
अडुळसा मोही भोपळी ॥
साव सिसवे सिरस कुड ।
कोळ कुंभा धावडा मोड ।
काळकुडा भुता बोकडा ।
कुरंडी हिरंडी लोखंडी ॥
विहाळ गिळी टेंभुरणी ।
अवीट एणके सोरकिन्ही ।
घोळी दालचिनी ।
कबाबचीनी जे ॥
निंबारे गोडे निंब ।
नाना महावृक्ष तळंब ।
गोरक्षचिंच लातंब ।
परोपरीची ॥
गोधनी शेलवंटी भोंकरी ।
मोहो बिब्बा रायबोरी ।
बेल फणस जांब भरी ।
चिंच अंबसोल अंबाडे ॥
चांफे चंदन रातांजन ।

पतंग मैलागर कांचन ।
पोपये खलेले खपान ।
वट पिंपळ उंबर ॥
आंबे निंबे साखरनिंबे ।
रेकण्या खरजूरी तूंते दाळिंबे ।
तुरडे विडे नारिंगे ।
शेवे कविट अंजीर सीताफळे ॥
जांब अननस देवदार ।
सुरमे खासे मंदार ।
पांढरे जंगली लाल ।
पुरे उद्वे चित्रकी ॥
केळी नारळी पोफळी ।
आवळी रायआवळी जांभळी ।
कुणकी गुगुळी सालफळी ।
वेलफळी माहाळुंगी ॥
भुईचांफे नागचांफे मोगरे ।
पारिजातक बटमोगरे ।
शंखासुर काळे मोगरे ।
सोनतरवड सोनफुले ॥
जाई सखजाई पीतजाई ।
त्रिविध शेवंती मालती जुई ।
पाडळी बकुळी अबई ।
नेवाळी केतकी चमेली ॥
सुर्यकमळिणी चंद्रकमळिणी ।
जास्वनी हनुमंतजास्वनी ।
केशर कुसुंबी कमळिणी ।
बहुरंग निळायाति ॥
तुळसी काळी त्रिसेंदरी ।
त्रिसिंगी रायचचु रायपेटारी ।
गुलखत निगुलचिन कनेरी ।
नानाविध मखमाली ॥
काळा वाळा मरुवा नाना ।
कचोरे गवले दवणा ।
पाच राजगिरे नाना ।
हळदी करडी गुलटोप ॥
वांगी चाकवत मेथी पोकळा ।
माठ शेपु खोळ बसळा ।
चवळी चुका वेल सबळा ।
अंबुजिरे मोहरी ॥
कांदे मोळकांदे माईणमुळे ।
लसूण आलें रताळें ।
कांचन कारिजे माठमुळे ।
सुरण गाजरें ॥
भोंपळे नाना प्रकारचे ।
लहानथोर पत्रवेलीचे ।
गळ्याचे पेढ्या सांगडीचे ।
वक्र वर्तुळ लंबायमान ॥
गंगाफळ काशीफळे क्षीरसागर ।
सुगरवे सिंगाडे देवडांगर ।
दुधे गंगारूढे प्रकार ।
किनऱ्या रुद्रविण्याचे ॥
वाळक्या कांकड्या चिवड्या ।
कोहाळे सेंदण्या सेंदाड्या ।
खरबूजा तरबुजा कलंगड्या ।
द्राक्षी मिरवेली पानवेली ॥
दोडक्या पारोशा पडवळ्या ।
चवळ्या कारल्या तोंडल्या ।
घेवड्या कुही-या खरमुळ्या ।
वेली अळूचमकोरे ॥
अठराभार वनस्पती ।
नामे सांगावी किती ।
अल्प बोलिलो श्रोतीं ।
क्षमा केली पाहिजे ॥

## जुलै-२३ चा सेवक वार्ताचा अंक हा "सेवक सदस्य कविता विशेषांक

**सेवक संघामध्ये अनेक कवी असल्याचे आढळून येत आहे. त्यांच्या प्रतिभेचा योग्य सन्मान होऊन त्यांना संघ मंचावर उचित स्थान व प्रसिद्धी देणे आता अगत्याचे ठरत असल्याने माहे जुलै-२३ चा सेवक वार्ताचा अंक हा "सेवक सदस्य कविता विशेषांक" म्हणून प्रकाशित करण्यात येईल. तरी सेवक संघाच्या सदस्यांनी आपल्या कविता मला DVBW-TT Yogesh किंवा UNICODE- NIRMALA UI फॉन्टमध्ये पाठवाव्यात, असे आवाहन करण्यात येत आहे. कविता मराठीत व यापुर्वी अप्रकाशित असावी. विषय निसर्ग वाबींशी सबंधित असावा.सेवक संघ मध्यवर्ती कार्यकारी समितीला, उत्कृष्ट कवितेला एक हजार रुपये कौतुक निधी मंजूर करण्यात यावा अशी विनंती करण्यात आली आहे**

## नवीन सदस्य


श्री इंदासभाई शंकर (आयएस) पाटील, सेवानिवृत्त सवसं, मूळ राहणार शहादा व सध्या स्थायीक नाशिक, यांनी धुळे सेवक संघ शाखेचे आजीवन सदस्यत्व स्वीकारले आहे. २५ मे २०२३ पासून ते आता आजीवन सदस्य झालेत. त्यांचे सर्व सदस्यांचे वतीने हार्दिक स्वागत.त्यांचे अभिनंदन.

श्री. आर वाय माळी, सेवानिवृत्त वनपाल, वनविकास महामंडळ, नाशिक, यांनी धुळे शाखेत सन २०२३-२४ साठी वार्षिक सदस्यत्व घेतले आहे.
त्यांचे सहर्ष स्वागत.

**निवृत्त वनपाल श्री अमित उंद्रीवाडे यांच्या पुत्राची भारतीय प्रशासकीय सेवेत निवड**

श्री अमित उंद्रीवाडे, निवृत्त वनपाल यांचा पुत्र याची भारतीय प्रशासकीय सेवेत निवड झाल्याबद्दल त्याचे व त्याच्या आई-वडिलांचे हार्दीक सेवक संघातर्फे हार्दिकअभिनंदन. श्री. उंदीरवाडे, गोंदिया वन विभागात वनरक्षक होते. त्यांचा मुलगा अमित ५८९ रँकने केंद्रीय लोकसेवा आयोग २०२२ची परीक्षा उत्तीर्ण केली. ही वन विभागास गौरव देणारी घटना आहे.नागपूर शाखेने अमित व त्याचे माता-पित्यांचा भव्य सत्कार करण्याचे योजिले असून त्यासाठी रू. १०,०००/- खर्च करण्यास सेवक कार्यकारणीने मंजूरी प्रदान केली आहे. यासाठी श्री खुणे सदस्य हे पुढाकार घेत आहेत. दि. १ जून 23 रोजी साकोली येथे जे. एम. पटेल महाविद्यालयात कार्यक्रम ठेवण्यात आला आहे.

## श्री. वसंत जोशी यांचे प्रकाशित होत असलेले पंधरावे पुस्तक ..



**श्री. वसंत जोशी कळवितात की . . . .**

'Dnyaneshwari Implied Meaning Revealed' हे मी वेदांतकेसरी श्री बाबाजी महाराज पंडित यांनी लिहिलेल्या 'श्री ज्ञानेश्वरी गूढार्थ दीपिका' ह्या पुस्तकाचे इंग्लिश मध्ये केलेले भाषांतर आहे.
ज्ञानेश्वरीचे इंग्लिश भाषांतर मी ह्यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या माझ्या 'Dnyaneshwari Today' पुस्तकात केलेले होते. तथापि त्यात ज्ञानेश्वर यांच्या मूळ ओव्यांचे इंग्लिश verse मध्ये रुपांतर केले होते. आता त्यातील गूढ अर्थ ह्या नवीन पुस्तकात केलेला असल्याने मी त्याचा समावेश माझ्या पहिल्या पुस्तकात केलेला आहे. त्यामुळे ज्ञानेश्वरीतील अनेक अगम्य ओव्यांचा अर्थ अधिक सुलभ रीतीने वाचकास समजून येईल. हा खंड १ आहे, ज्यामध्ये ज्ञानेश्वरी अध्याय १ ते ६ समाविष्ट आहेत. दुस-या खंडाचे लिखाणकाम प्रगतीपथावर आहे.

## निधन वार्ता

*श्री शिवाजीराव मोहिते, सेवानिवृत्त विभागीय वन अधिकारी यांचे 26-5-2023 रोजी निधन झाले. पंचगंगा घाट कोल्हापूर येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.
* सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात एसीएफ म्हणून काम केलेले एम व्ही नाईक यांचे निधन झाले.
ईश्वर त्यांचे आत्म्यास सदगती देवो. सेवक संघातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक - सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे
संपादन - एस. के. गवळी